# विपश्यना

साधकांचे मासिक प्रेरणा पत्र

**बुद्धवर्ष २५५७, फाल्गुन पौर्णिमा, १६ मार्च, २०१४ वर्ष ३ अंक १**

वेगवेगळ्या भाषेतील पत्रिकांसाठी पाहाः - http://www.vridhamma.org/Newsletter_Home.aspx


**धम्मवाणी**

**येसं सम्बोधियङ्गेसु, सम्मा चित्तं सुभावितं।**
**आदानपटिनिस्सग्गे, अनुपादाय ये रता।**
**खीणासवा जुतिमन्तो, ते लोके परिनिब्बुता॥**

*धम्मपद- ८९, पण्डितवग्गो.*

संबोधीच्या अंगांमध्ये ज्यांचे चित्त सम्यक रितीने भावित (अभ्यस्त) झाले आहे, जे परिग्रहाचा परित्याग करून अपरिग्रहात रत आहेत, आश्रव (चित्तमळ) क्षीण, असेच तेजस्वी (पुरुष) लोकात निर्वाण प्राप्त आहेत.

## आनंदबोधी

कोशल देशाची राजधानी श्रावस्तीत श्रेष्ठी अनाथपिंडिकाने करोडो रुपये खर्चून जेतवनात महाविहार बनविला. भगवान वर्षावासाच्या दिवसात त्या विहारात राहायचे व लोकांना धर्म शिकवायचे. वर्षावासानंतर ते अन्य प्रदेशांच्या लोकांना धर्म शिकविण्यासाठी चारिकेवर निघायचे. भगवानांच्या निवास काळात विहारात जी लोकांची गर्दी राहायची, ती त्यांच्या अनुपस्थितीमुळे खूप कमी व्हायची. वातावरण तेवढे जिवंत राहात नसे, शांत राहात असे. काही नगरवासी भक्तजन विहारात येत असत. भगवानांच्या निवासाच्या रिकाम्या कुटीसमोर श्रद्धेचे फूल चढवून जात असत. परंतु त्यांचे समाधान होत नव्हते. श्रद्धा व्यक्त करण्यासाठी त्यांना काही ठोस आधार पाहिजे होता. श्रेष्ठी अनाथपिंडिकाला ही कमतरता जाणवायची. लोकांची इच्छा होती की भगवानांच्या अनुपस्थितीत, तिथे एखादे मंदिर असावे, जिथे ते आपली श्रद्धा प्रकट करू शकतील. त्या काळात ही प्रथा होती. लोक आपली श्रद्धा असणाऱ्या देवी, देवता, यक्ष, ब्रह्म अथवा संतांच्या नावावर चैत्य बनवायचे, मंदिर बनवायचे. ह्यात आपल्या इष्टाची मूर्ती अथवा चिन्ह स्थापित करायचे. ह्या चैत्य व देवस्थानांवर एकटे वा समूहात भक्त जन जात, पूजन, अर्चन करीत, पत्र, पुष्प चढवीत, धूप, दीप पेटवीत, नवस करीत, नवस पूर्ण झाल्यावर मंगल उत्सव साजरा करीत. ह्या प्रकारे या देवस्थानांवर खूप धामधूम व आनंद उल्हासाचे वातावरण राहात असे.

श्रेष्ठी अनाथपिंडिकाची इच्छा होती की असेच काही जेतवनातही असावे, ज्यामुळे भगवानांच्या अनुपस्थितीतही तिथे आनंद उल्हासाचे वातावरण राहील. त्याने आपली मनोकामना भिक्षू आनंदांसमोर प्रकट केली. आनंदांनी खूप व्यवहार कौशल्याने ही बाब भगवानांपर्यंत पोहोचविली. त्यांनी भगवानांना विचारले -

'भंते भगवान ! चैत्य किती प्रकारचे असतात ?'

भगवान म्हणाले 'तीन प्रकारचे - शारीरिक, उद्येशिक व पारिभोगिक'. आनंदांनी विचारले 'भगवान ! बुद्धांच्या जिवंतपणी त्यांच्या नावावर एखादा चैत्य बनविला जाऊ शकतो काय ?'

भगवान म्हणाले 'शारीरिक चैत्य तथागतांच्या शरीर त्यागानंतर त्यांच्या अस्थी अवशेषांवरच बनू शकतो. उद्येशिक चैत्यात मूर्ती, चिन्ह इत्यादींच्या स्थापनेद्वारे मनोकल्पनेची प्रमुखता असते जी अवांछनीय असते. होय, पारिभोगिक चैत्य तथागताच्या जीवन काळातही बनू शकतो'.

आनंदांनी अनाथपिंडिकाची इच्छा सांगून जेतवनात असे एक पारिभोगिक चैत्य बनविण्याची परवानगी मागितली, ज्यामुळे त्यांच्या अनुपस्थितीतही जेतवन रिकामे व निरूत्साही राहू नये.

हे तर स्पष्ट होते की भगवानांच्या परिनिर्वाणानंतर त्यांनी वापरलेल्या भिक्षापात्र, चीवर इत्यादी वस्तूंवर चैत्य बनू लागतील. परंतु जिवंतपणी ते अशी परंपरा स्थापन करू इच्छित होते की जी धर्माच्या परम अर्थाच्या क्षेत्रात स्वस्थ असेल, कल्याणकारी असेल. ते आपल्या वापरलेल्या कोणत्याही भौतिक वस्तूंवर कोणतेही चैत्य बनवू इच्छित नव्हते. लोकोत्तर निर्वाणाच्या प्राप्तीसाठी ज्याचा उपयोग केला तो तर बोधिवृक्ष होता. त्यामुळे आनंदांचे लक्ष त्याकडे वेधून भगवान म्हणाले 'तथागतांच्या जिवंतपणी **बोधिवृक्षच पारिभोगिक चैत्य** असतो. ज्याच्या सावलीत बसून इतर लोकही निर्वाणाच्या सुखाचा आस्वाद घेऊ शकतील'.

आनंदांना ही बाब खूप आवडली. त्यांनी महामोग्गल्लानांना विनंती केली व त्यांच्यामार्फत बोधगयेच्या बोधिवृक्षाचे बीज मागविले आणि महाराज प्रसेनजीत, माता विशाखा व अन्य भक्तांच्या उपस्थितीत जेतवनाच्या मुख्य द्वाराजवळ श्रेष्ठी अनाथपिंडिकाद्वारे ह्याचे रोपण करविले. जेव्हा वृक्ष मोठा झाला, तेव्हा हा आनंदांच्या सत्प्रयत्नांमुळे लावला गेला होता म्हणून याला **'आनंदबोधी'** नाव पडले.

आनंदांनी भगवानांना प्रार्थना केली की ज्या प्रकारे त्यांनी बोधिवृक्षाच्या खाली बसून रात्रभर साधना केली होती , त्याच प्रकारे येथेही करावी. सम्यक संबोधी जागविणारी साधना तर अद्वितीयच असते. तरीही भगवानांनी साधकांच्या कल्याणासाठी आनंदबोधीच्या खाली एक पूर्णरात्र निरोध समापत्तीची साधना केली व त्या स्थानाच्या अणुरेणूंना निर्वाणधातू आणि धर्मधातूंच्या तरंगांनी भरून टाकले व चिरकाळासाठी परम पावन बनविले.

सर्वसाधारण सामान्य गृहस्थच नाहीत, तर अनेक भिक्षूही जे भगवानांच्या साधनेसंबंधी गंभीर धर्मात परिपक्व होऊ शकले नाहीत, ते भगवानांच्या जीवनकाळातच ह्या आनंदबोधी रूपी चैत्यावर श्रद्धा भक्तीचे पुष्प चढवून पुण्य अर्जित करीत राहिले. ही परंपरा ह्यापुढेही चालत राहिली. ह्यासोबतच एक अन्य परंपरा गंभीर साधकांचीही होती. त्यांनी भगवानांच्या जीवनकाळात आणि त्यानंतरही आनंदबोधीचा उपयोग साधनेसाठी केला. आनंदबोधी

आजही जिवंत आहे. कदाचित हा जगातील सर्वात पुरातन वृक्ष आहे. भारतातील पुनर्जागृत विपश्यनेचे गंभीर साधक आजही जेव्हा ह्या पावन वृक्षाखाली बसून विपश्यना साधना करतात, तेव्हा त्यांना जाणवते की त्वरित त्यांचे मन अनित्यबोधाच्या तरंगांनी तरंगित होऊ लागते.

**(वि.वि.वि. द्वारे प्रकाशित अनाथपिंडिक पुस्तकातून साभार घेतलेले)**

## पॅगोड्याच्या परिसरात 'जयश्री महाबोधी' वृक्षारोपण संपन्न

दिनांक २ मार्च २०१४ ला विश्व विपश्यना पॅगोड्याच्या परिसरातील पूर्वेकडील भागात श्रीलंकेमधून आणलेल्या जयश्री महाबोधी वृक्षाच्या रोपाचा रोपण समारंभ विधिवत संपन्न झाला. ही त्याच बोधिवृक्षाची शाखा आहे, ज्याच्याखाली बसून बोधिसत्व सिद्धार्थ गौतमांना सम्यक संबोधी प्राप्त झाली होती. ज्यामुळे ते निर्वाणिक अवस्थेस प्राप्त होऊन नेहमीसाठी जन्म-मरणाच्या बंधनातून मुक्त झाले होते. त्यानंतर त्याच्याच आजूबाजूला सात आठवड्यापर्यंत निर्वाणिक सुखाची अनुभूती करीत सतत ध्यानमग्न राहिले. ह्या प्रकारे अरहंत झालेले भगवान बुद्ध 'तथागत' म्हणविले गेले. त्यांनी केवळ आपलीच मुक्ती साधली नाही, तर अन्य अनेकांना भवमुक्त होण्याचा मार्ग दाखविला. त्यांच्या ध्यान साधनेमुळे हा वृक्षही धन्य झाला. आता याला **'महाबोधी'** वृक्ष संबोधले जाऊ लागले. ह्याच्या सावलीत ध्यान करण्यासाठी अनेक व्यक्ती इच्छुक होऊ लागल्या. भगवानांच्या जीवनकाळात असंख्य लोकांचे मंगल कल्याण झाले.

ह्याच महाबोधी वृक्षाची शाखा भगवान बुद्धांच्या जीवनकाळात अनाथपिंडिकाच्या आग्रहामुळे व भगवानांचे उपस्थाक (स्वीय सहायक) भिक्षू आनंदांच्या प्रयत्नांमुळे श्रावस्तीत बनलेल्या अनाथपिंडिक महाविहारात लावण्यात आली, जसे की वर सांगितल्या प्रमाणे हा वृक्ष भिक्षू आनंदांच्या सत्प्रयत्नांनी लावला गेला होता, म्हणून **'आनंदबोधी'** नावाने विश्व विख्यात झाला.

भगवान बुद्धांच्या अडीचशे वर्षांनंतर भारतात सम्राट अशोकाचे राज्य झाले. तो सम्राट जो आपल्या क्रूर कर्मांमुळे **'चंड अशोका'** च्या नावाने जाणला जात होता, ह्या विद्येच्या संपर्कात येताच इतका बदलला की त्याने आपले सारे जीवन लोक कल्याणात लावले. त्यानंतर तो **'धम्म अशोक'** ह्या नावाने प्रसिद्ध झाला. त्याने गावागावात विहार बनविले आणि प्रत्येक विहारात एक स्तूपही. ह्या प्रकारे त्याने ८४,००० स्तूप बनविले, ज्यात भगवान बुद्धांच्या शरीरधातूंना स्थापित केले. ज्यामुळे त्याची सारी प्रजा भगवान बुद्धांच्या सान्निध्याचा अनुभव करू शकेल. तसेच त्यांच्या शिकविलेल्या विद्येचा अभ्यास करून धर्मरसाचा आस्वाद घेऊन आपले कल्याण साधू शकेल. त्याच्या ह्या कल्याण भावनेमुळे जवळपासचे देशही प्रभावित झाले. त्याने केवळ ह्या विद्येलाच नाही, तर भगवान बुद्धांच्या वाणीला व धातूनांही भारताबाहेर पाठविले. त्याने आपला प्रिय पुत्र महेंद्रास भिक्षुसंघाला समर्पित केले. अरंहत भिक्षू महेंद्राला धर्म शिकविण्यासाठी श्रीलंकेला पाठविले. श्रीलंकेत राजा देवानां पियतिस्सने त्यांचे स्वागत केले व धर्म शिकून तो श्रद्धाळू बनला. भिक्षू महेन्द्राने तेथे बोधगयेच्या बोधिवृक्षाची शाखा लावण्याचा प्रस्ताव पांडला. राजा पियतिस्सने ह्यासाठी महाराज सम्राट अशोकाला विनंती केली. त्याच्या आग्रहाला स्वीकारून सम्राट अशोकाने भिक्षुनी बनून अरहंत झालेली आपली मुलगी संघमित्रासोबत बोधिवृक्षाच्या दक्षिण शाखेचे एक रोपटे पाठविले. जिला अनुराधापुरात रोपले गेले. तेथे लावल्यावर ह्या रोपाला **'जयश्री महाबोधी'** हे नाव देण्यात आले. तेव्हापासून आजपर्यंत हा वृक्ष अखंड रूपाने जिवंत आहे व विश्वातील सर्वात जुन्या वृक्षातील एक मानला जातो. याच्या शाखा विश्वातील काही अन्य देशातही लावण्यात आल्या, जेथे त्या वाढत आहेत. लोक ह्यांची पूजा करतात व ध्यान करणारे ह्याखाली बसून ध्यानलाभी होतात.

त्याच इतिहासाची पुनरावृत्ती करीत आता **'जयश्री महाबोधी'** ची एक शाखा अधिकारिक रूपाने श्रीलंकेतून पुन्हा भारतात आली आहे. अनुराधापुराचे आदरणीय भंते अटमस्थानाधिपती (अनुराधापुरा क्षेत्राच्या आठ धर्म स्थळांचे अधिपती) नायक डॉ. पल्लेगम सिरिनिवास नायक थेर, आपले सचिव, सहायक व अन्य इतर नऊ भिक्षू तसेच काही गृहस्थांसोबत ही शाखा घेऊन आले. पॅगोड्याच्या परिसरात आयोजित एका समारंभात बोधिवृक्षाच्या इतिहासाचा उल्लेख करीत ह्या शाखेला विधिवत विपश्यनेच्या प्रमुख आचार्या श्रीमती इलायचीदेवींच्या हाताने रोपण करून, हिच्या अधिकृत समर्पणाची घोषणा केली. पूज्य श्रीमती इलायचीदेवींनी स्वीकार करुन ह्याला **'सध्दम्म सिरि महाबोधी'** नावाने संबोधीत केले. अशा प्रकारे आता जगाच्या इतिहासात तो ह्याच नावाने ओळख जाईल. ग्लोबल विपश्यना फाउंडेशन, विपश्यना विशोधन विन्यास व धम्मपत्तन विपश्यना केंद्राच्या सर्व ट्रस्टींनी मिळून ह्या रोपणाला माती व पाणी टाकून सफल बनविले. ह्या कार्यक्रमास हजर असलेल्या जवळपास ३००० लोकांनी अनुमोदन करीत साधुकार केला. समारोपात भाग घेण्यासाठी श्रीलंकेच्या कांसुलेट जनरल कु. उपेक्खा समरतुंगा व उपकांसुलेट जनरल श्री सेनारथ दिस्सनायकेही उपस्थित होते.

समारंभात भारतात राहाणारे श्रीलंकेचे अनेक भिक्षू व भारताच्या अनेक प्रांतातून आलेल्या जवळपास ६०-७० भिक्षूंव्यतिरिक्त विपश्यनेचे अनेक भिक्षू आचार्य, अनेक अन्य आचार्य, आचार्या व उपासक, उपासिकांनी मोठ्या संख्येने भाग घेतला. मंचाच्या जवळपास बनलेल्या मंडपात जागा नसल्यामुळे मोठ्या संख्येने लोकांना पॅगोड्याच्या मुख्य कक्षात बसविण्यात आले. जेथे संपूर्ण कार्यक्रम पाहण्याची व ऐकण्याची व्यवस्था केली होती. ह्यानंतर भिक्षूंसहित सर्वांच्या भोजनाची व्यवस्था करण्यात आली होती. भिक्षूंसाठी संघदानाचे आयोजन केले गेले. ज्यात भाग घेऊन गृहस्थ पुण्यलाभी झाले व मंगलमैत्रीचे अनुमोदन करून त्यांनी धन्यतेचा अनुभव केला.

आदरणीय भंते अटमस्थानाधिपती नायक डॉ. पल्लेगम सिरिनिवास नायक थेर यांनी बोधिवृक्षाच्या सुरक्षेचे उपाय सांगितले व लोकांना विनंती केली की याच्या मुळांजवळ कधीही दूध, तेल यासारखे पदार्थ टाकू नयेत. रोपाच्या सुरक्षेसाठी स्टेनलेस स्टीलच्या जाड जाळीने बनविलेला एक मोठा पिंज-यासारखा चौकोनी घेरा रोपाच्या चौफेर ठेवण्यात आला. ज्यामुळे जाणता-अजाणता कोणीही याच्याजवळ जाऊन ह्याला नुकसान पोहचवू शकणार नाही. खत व पाणी देण्यासाठी ह्या पिंज-याला एक दरवाजा बसविण्यात आला आहे, तो उघडूनच रोपाजवळ जाता येऊ शकते.

लवकरच हे रोप विशाल वृक्षाचे रुप धारण करेल. साधकसुध्दा ह्या प्रकारे सध्दर्मात प्रगती करीत राहोत. सर्वांचे मंगल होवो !

— **विपश्यना विशोधन विन्यास**



वृक्षारोपणानंतर माताजी पाणी टाकीत असतांना. सोबतच आदरणीय भंतेजी आपल्या हातांनी माती-पाणी टाकून रोप समर्पित करीत असतांना.



**"सध्दम्म सिरि महाबोधी"** जे श्रद्धापूर्वक श्रीलंकेहून आणले गेले.

## विपश्यना विशोधन विन्यास. ग्लोबल पगोडात पालि पाठ्यक्रम – २०१४

ग्लोबल पगोडात निवासी पाठ्यक्रम – सैध्दान्तिक (परियत्ती) आणि विपश्यना (परियत्ति). पालि व्याकरण, सुत्त इत्यादी –

**९० दिवसीय पाठ्यक्रम-पालि-इंग्रजी, वेळ** ०१-०६-२०१४ ते ३०-०८-२०१४ फक्त पुरूषांसाठी आवेदन पत्र जमा करण्याची शेवटची तारीख ३० एप्रील २०१४

**६० दिवसीय पाठ्यक्रम – पालि-इंग्रजी वेळ** १०-१०-२०१४ ते १०-१२-२०१४ पर्यंत, आवेदन पत्र जमा करण्याची शेवटची तारीख ०१-०९-२०१४ **सर्वासाठी कॉम्पुटर वर आवेदन पत्र** www.vridhamma.org वरून ही पाठवू शकता.

*प्रवेश योग्यता:-* (१) ज्या साधकांनी कमीत कमी **तीन १० दिवसाचे शिबिर** तसेच एक सतिपट्ठान शिबिर केलेले आहे. (२) एक वर्षापासून नियमितपणे दोन तासांची दैनिक साधना करणारे. (३) एक वर्षापासून पंचशीलाचे कडकपणे पालन करणारे आणि (४) कमीत कमी १२ वी इयत्ता पास झाल्याचे प्रमाणपत्र असले पाहिजे।

**संपर्क –** विपश्यना विशोधन विन्यास (VRI) ग्लोबल विपश्यना पगोडा एस्सेल वर्ड जवळ, बोरिवली (पश्चिम) मुंबई – ४०००९१

**अधिक माहितीसाठी संपर्क करा –**

डॉ. शारदा संघवा – फोनः (२३०९५४१३) ९२२३४६२८०५,

**ईमेलः mumbai@vridhamma.org,**

**director@vridhamma.org;**

२) श्रीमती बलजीत लाम्बा : फोनः ०९८३३५१८९७९;

३) अलका वेंगुर्लेकरः मो– ०९८२०५८३४४०.

### प्रो. अंगराज चौधरींचा पालि विद्वानाच्या रूपात सन्मान

वि. वि. विन्यासच्या सेवेत असणारे प्रो. अंगराज चौधरींना गेल्या १ मार्च रोजी इंडिया फाऊंडेशनच्या सेंटर फॉर स्टडीज ऑफ रिलिजन आणि सोसायटी द्वारे बुध्दिस्ट आणि इंडिक विश्वविद्यालय सांचीच्या नेतृत्वात आयोजित द्वितीय आंतरराष्ट्रीय धर्म-धम्म कोन्फरन्समध्ये मध्य प्रदेशचे मुख्य मंत्री श्री शिवराज सिंह चौहान द्वारे शाल, अजंठाचे एक प्रसिध्द चित्र, श्रीफळ इत्यादींनी पालि-विद्वानाच्या रूपात सन्मानित केले गेले.

### नव नियुक्ती
### सहायक आचार्य

१. श्रीमती कला वासनिक, चंद्रपुर
२. श्रीमती वाणी कोवेलामुदी, हैदराबाद
३. श्रीमती उर्वी सावजानी, राजकोट
४. श्री जॉन मेंडोंचा, सुरेंद्रनगर
५. डॉ. सुरेश कोटांगळे, भंडारा
६. श्री अनिल सपकाळे, उल्हासनगर
७. श्री महावीर शेटे, कोल्हापुर
8. Mr. Michel Brissot, France

### बालशिविर शिक्षक

१. श्री विशाल कांबले, वाई
२. कु. कंचन पाटिल, नाशिक
३. श्रीमती सुनयना अग्रवाल, नाशिक
४. श्री दीपक गढे, नाशिक
५. श्रीमती आरती तोषणीवाल, नाशिक
६. श्रीमती पुनम कुंभारे, लोणावला
७-८. श्री अनिल एवं श्रीमती अंकिता मोहिते, रायगड
९. श्री संतोष मोहिते, रत्नागिरि
१०. श्री संदीप कांबले, रत्नागिरि
११. श्रीमती शोभा राजमाने, रत्नागिरि
१२. श्रीमती युगंधरा राजशिरके, रत्नागिरि
१३, श्रीमती प्रतिभा साठे, पुणे
१४. कु. साराह रंगूनवाला, पुणे
१५. श्री दीपक सालुंके, इचलकरंजी
१६. डॉ. प्रज्ञा पाटिल, इचलकरंजी
१७. कु. प्रियंका पाटिल, इचलकरंजी
१८. श्री श्यामलाल कलानी, कोल्हापुर
१९-२०. श्री संदीप एवं श्रीमती दीपा सरनायक, कोल्हापुर
२१. कु. मृणालिनी बेलवलकर, जयसिंहपुर
२२-२३. श्री अरुणकुमार एवं श्रीमती सपना सेठी, भोपाल
२४. श्रीमती सुजाता चकमा, चेन्नई
२५. श्री आर.आर. रामकृष्णन, चेन्नई
२६. श्री के. बागीरथन, चेन्नई
२७. श्री जयशंकर, कोयमबटूर
२८. श्री राकेश निर्मल, मदुराई
२९. श्रीमती बिंदियाबेन जोशी, राजकोट
३०. श्रीमती दिव्याबेन शुक्ला, राजकोट
३१. श्रीमती गार्गीबेन ठक्कर, राजकोट
३२. श्रीमती गीताबेन रायचूरिया, राजकोट
३३. श्रीमती किंजलबेन शाह, राजकोट
३४. श्रीमती कीर्तिबेन वेगदा, राजकोट
३५. श्रीमती कीर्तिबेन सापरिया, राजकोट
३६. श्रीमती मनीषाबेन पटेल, राजकोट
३७. श्रीमती मंजुलाबेन पंभार, राजकोट
३८. कु. मयूरीबेन बोसामिया, राजकोट
३९. श्रीमती नीलमबेन लाठीगरा, राजकोट
४०. श्रीमती समजूबेन तांती, राजकोट
४१. श्रीमती उमाबेन पटेल, राजकोट
४२. श्रीमती वीनाबेन जालावाडिया, राजकोट
४३. श्री अनिल बोरकर, गोवा
४४. श्री राजीव डोगरे, रायगड
४५. डॉ. श्रीमती भारती अंकुश, नवी मुंबई
४६. श्री नरेंद्र गाडे, नवी मुंबई
47. Mr. Allen Hsiao, Taiwan
48. Mr. Bo Rui Chen, Taiwan
49. Mr.Hsiang-Lai T, Taiwan
50. Ms. Li-Yung Yu, Taiwan
51. Ms.Mei-Hua Liu, Taiwan
52. Mrs. Yu Chang, Taiwan
53. Ms. Yu Jung, Chiu Taiwan
54. Dr Liu Jie, China.

**२०१४ मध्ये खालील प्रसंगी पूज्य माताजींच्या साक्षिध्यात एक दिवसीय महाशिबिर**

**बुद्धपौर्णिमा, रविवार, १८ मे, आषाढी पौर्णिमा, रविवार, १३ जुलै व पूज्य गुरूदेवांच्या पुण्यतिथीनिमित्त रविवार, २८ सप्टेंबरला, वेळ-** सकाळी **११** वाजेपासून दुपारी **४** वाजेपर्यंत, **'ग्लोबल विपश्यना पॅगोड्यात'**. येथे **३ वाजता दिवंगत गुरुदेवांच्या रेकॉर्डेड प्रवचनात साधना न केलेले लोकही बसू शकतात.** कृपया खालील फोन नंबरवर अथवा ईमेलने त्वरित संपर्क साधावा. **कृपया बुकिंग केल्याविना येऊ नये. बुकिंग संपर्क-** फोन नं.: 022-28451170 / 022-33747501- Extn. 9, 022-33747543 / 33747544, (**फोन बुकिंग-** सकाळी ११ ते सायं ५ पर्यंत,रोज)

ईमेलः **Regn: oneday@globalpagoda.org**

**Online Registration: www.oneday.globalpagoda.org**

### "धम्मालय" अतिथिगृहाचा उद्घाटन समारंभ –

येत्या १७ एप्रीलला पगोडा परिसरात पर्यटकांसाठी संपूर्ण सुविधेसह बनविलेले नव निर्मित भवन "धम्मालय" चा उद्घाटन समारंभ आदरणीय बर्मी भिक्षूंच्या उपस्थितीत संपन्न होणार आहे.

---०---

### मंगल मृत्यू

भुज-कच्छच्या ६९ वर्षीय वरिष्ठ सहाय्यक आचार्या डॉ (मिस) शांतुबेन पटेल यांचा मृत्यू २९ जानेवारीला झाला. त्या लक्षणहीन पोटाच्या कॅन्सरने आजारी होत्या. जरी त्यांना शेवटच्या कांही दिवसात भयंकर यातना झाल्या तरी शेवटचा क्षण खूपच शांतीपूर्वक गेला.

त्यांची सर्वात मोठी देणगी ही होती की त्यांनी मूक-बधिर, अल्पबुध्दी इत्यादींनी विकलांग मुलांना खूप सफल पध्दतीने आनापान आणि विपश्यना शिकविली.

संशोधन करणाऱ्या वैज्ञानिकांनी पहिल्यांदाच केल्या गेलेल्या ह्या उत्तरोत्तर प्रगती करणाऱ्या स्तुत्य प्रयत्नांचे अनुसरण केले. विपश्यना विशोधन विन्यासने त्यांच्या ह्या प्रयत्नाबद्दल आभार मानले तसेच त्यांची अनेक शोधपत्र प्रकाशित केली, ज्यांची जगभरात प्रशंसा केली गेली.

ॐ✧ॐ

### विश्व विपश्यना पगोडा परिसरात विशोधनासाठी बृहत् पुस्तकालय

पूज्य गुरूजींची महती इच्छा विशोधनाला प्रोत्साहन देणे आणि त्यासाठी एक पुस्तकालय बनविण्याची होती ज्यामध्ये विशोधनासाठी सर्व उपयुक्त पुस्तके असावीत. आम्हाला ही बातमी देतांना आनंद होत आहे की पूज्य गुरूजींची ही इच्छा पूर्ण झाली आहे. पूजनीया माताजींनी "ग्लोबल विपश्यना पगोडावर" स्थापित ह्या पुस्तकालयाचे उद्घाटन १९ जानेवारी २०१४ रोजी आपल्या करकमलांनी केले. हे पुस्तकालय विपश्यना विशोधन विन्यास (वि. आर. आई.) च्या देखरेखी खाली आहे.

सध्या ह्या पुस्तकालयात जवळ-जवळ दहा हजार (१०,०००) पुस्तके आहेत. त्यामध्ये एन-सायक्लोपीडिया डिक्शनरी (शब्दकोश), जर्नल, विपश्यने संबंधी पुस्तके, विपश्यना विशोधन विन्यासद्वारे प्रकाशित पुस्तके, अन्य धर्म व दर्शनावर प्रकाशित पुस्तकांचा समावेश आहे. ह्या पुस्तकालयात जवळ-जवळ ४०,००० पुस्तकांसाठी जागा आहे. सोबतच एक विशोधनालय सुध्दा आहे, ज्याला विशोधक (फक्त विद्यार्थी) उपयोगात आणू शकतील. पुस्तकालयाचा उर्वरित भाग केवळ साधक तसेच कॉलेजच्या विद्यार्थ्यांसाठी राखीव आहे. ते ह्याचा उपयोग खाली दिलेल्या वेळापत्रकाप्रमाणे करू शकतात.

सोमवार ते शुक्रवार (बुधवार सोडून) दुपारी १२ वाजेपासून सायंकाळी ४ वाजेपर्यंत.

शनिवार आणि रविवार-दुपारी १२ वाजेपासून संध्याकाळी ५ वाजेपर्यंत.

ॐ✧ॐ

### दोहे धर्माचे

**पूजनीयास पूजता, होते महा कल्याण।**
**वय वर्ण सुख बल वाढे, देता वृद्धा सन्मान।।**

**दुर्जन संग करू नये, सज्जन संगच होय।**
**पूजनीयास पूजता, उत्तम मंगलच होय।।**

**संतांची संगत भली, मंगलकारक होय।**
**सांप्रदायिक तम मिटवे, धर्म प्रकाशक होय।।**

**मंगल मंगल धर्माचे, फलही मंगल होय।**
**अंतरी गाठी सुटती, मानस निर्मल होय।।**

**शुद्ध धर्म पुन्हा जागो, दुःखी न राहो जन।**
**शुद्ध धर्म जगी पसरो, मंगल कर्मी हो जन।।**

### दोहे धर्माचे

**आठ अंगी धर्म पंथ, दिला बुद्ध भगवान।**
**पद पद चालून स्वतःच, पावतो पद निर्वाण।।**

**मंगलमयी विपश्यना, विद्या दिली भगवान।**
**दररोजी अभ्यासाने, साधते निज कल्याण।।**

**हानी लाभ निंदा यश, सुख दुख मान अपमान।**
**मन विचलित होऊ नये, असो धर्माचे ध्यान।।**

**मिथ्याच पूजा अर्चना, मिथ्या कर्मकांडेच।**
**चाखे न थेंब धर्माचा, रिक्त असे भांडेच।।**

**पूजा अर्चना वंदना, शुद्ध धर्मची होय।**
**जीवनात जागो धर्म, तर मंगलची होय।।**

**विपश्यना विशोधन विन्यास**
धम्मगिरी, इगतपुरी - 422 403
जिल्हा- नाशिक, महाराष्ट्र, भारत
**फोन :** (02553) 244076, 244086, 243712, 243238. **फैक्स :** (02553) 244176
Email: info@giri.dhamma.org
Website: www.vridhamma.org